# प्रेसनोट दि.३०/१०/२०१८

## पोलीसांच्या "मास रेड" मध्ये बुधवार पेठ रेड लाईट एरिया मधुन ५ अल्पवयीन सह १६ सज्ञान मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका केले बाबत....

दि.२९.१०.२०१८ रोजी सांय १८.३० वा. मा.श्री. भानुप्रताप बर्गे, सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे -२, पुणे यांना मिळालेल्या बातमीनुसार बुधवारपेठ रेड लाईट एरिया मध्ये "**मास रेड**" करण्यात येवुन घर नं. ९९४, नविन बिल्डींग, बुधवार पेठ पुणे येथुन एकुण २१ मुलींची सुटका करण्यात आलेली असुन त्यामध्ये ५ मुली हया अल्पवयीन असुन त्यापैकी २ मुलींची जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करण्यापुर्वी त्यांची सुटका करण्यात आली आहे. याबाबतची सविस्तर माहीती खालील प्रमाणे आहे.

मिळालेल्या बातमीनुसार मा.श्री.भानुप्रताप बर्गे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे -२ यांचेसह वपोनि.सौ.मनिषा झेंडे, पो.नि.श्री. दिपक लगड, पो.नि.श्री.अंजुमन बागवान, वपोनि श्री. किशोर नावंदे, सपोनि.सौ.अश्वीनी जगताप, सपोनि सौ. शिंदे पोउनि.श्री.अनंत व्यवहारे व कर्मचारी यांनी बूधवार पेठ पुणे घर नं. ९९४, नविन बिल्डींग मध्ये संयुक्त कारवाई करून राज्यातील व परराज्यातील ५ अल्पवयीन व १६ सज्ञान पिडीत मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका केली आहे.

**नमुद मुलींपैकी महाराष्ट्रातील २ अल्पवयीन मुलींना चांगले काम देण्याच्या बहाण्याने डोंबीवली येथुन कालच दिनांक २९/१०/२०१८ रोजी पहाटेच्या वेळी अज्ञात महिला आरोपीच्याद्वारे आणुन त्यांना घर नं. ९९४, नविन बिल्डींग, बुधवार पेठ कुंटनखाना मालकीन कल्पना राजु शर्मा, हिस विकलेले होते. सुदैवाने दोन्ही मुलींकडुन जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करवुन घेण्यापुर्वीच त्यांची वेश्याव्यवसायातुन सुटका करण्यास यश प्राप्त झालेले आहे.** इतर ३ अल्पवयीन मुली या गुजरात, पश्चिम बंगाल, झारखंड राज्यातील असुन १६ सज्ञान मुली या (१) कर्नाटक -१ , (२) पश्चिम बंगाल- ४ (३) दार्जिलिंग-१, (४) झारखंड-१, (५) कलकत्ता -३, (६) नेपाळ – ५, (७) महाराष्ट्र -१ अशा राज्यातील आहेत.

वरील नमुद पिडीत मुलींना वेश्याव्यवसायास लावणा-या कुंटणखाना मालकीणीनामे १) कल्पना राजु शर्मा वय ३८ वर्षे, रा. घर नं. ९९४, नविन बिल्डींग, बुधवार पेठ, पुणे मुळगांव भागमती आंचल, वार्ड नं. ५, काठमांडु नेपाळ. २) अनु लक्ष्मिकांत शर्मा वय ६५ वर्षे, रा. घर नं. ९९४, नविन बिल्डींग, बुधवार पेठ, पुणे मुळगांव वार्ड नं. ५, काठमांडु नेपाळ. ३) झरीना सुनिल तमांग वय ४७ वर्षे, रा. घर नं. ९९४, नविन बिल्डींग, बुधवार पेठ, पुणे मुळगांव भक्तपुर वार्ड नं. ५, काठमांडु नेपाळ ४) गंगामाया जिवन तमांग वय ५० वर्षे, रा. घर नं. ९९४, नविन बिल्डींग, बुधवार पेठ, पुणे मुळगांव सिंधुपालचो वार्ड नं. ३, काठमांडु नेपाळ.५) सैली सोनम लामा वय ४० वर्षे, रा. घर नं. ९९४, नविन बिल्डींग, बुधवार पेठ, पुणे मुळगांव वार्ड नं. ४, पो.ठाणे शिरसे, जिल्हा चवथरा काठमांडु नेपाळ ६) राजु यांचे विरुध्द फरासखाना पोलीस स्टेशन येथे गुरनं. ३२०/२०१८ भादवि क ३४४, ३६३, ३६६(अ), ३७०,३७०(अ), ३७२, ३७३, ३४ इटपा ॲक्ट ३, ४, ५, ६, ७ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला असुन अ.क्र.१ ते ५ यांना यांना कारवाईचे वेळी ताब्यात घेण्यात आले आहे.

तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु होम, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे. तसेच पुढील तपास फरासखाना पोलीस स्टेशनकडे सुपुर्त केला आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सौ.मनिषा झेंडे, पो.नि.श्री. दिपक लगड, पो.नि.श्री.अंजुमन बागवान, सपोनि.सौ.अश्वीनी जगताप, पोउनि.श्री.अनंत व्यवहारे, तसेच गुन्हे शाखेकडील कर्मचारी यांनी व फरासखाना पोलीस स्टेशनकडील वपोनि श्री. किशोर नावंदे, सपोनि सौ. शिंदे व त्यांचे स्टाफसह सयुंक्तीक कारवाई केली आहे.